डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
(प्रौढ, निरंतर शिक्षण विस्तारसेवा विभाग)
माहितीचा अधिकार आधीनियम २००५
(कलम ४ नुसार १७ मॅन्युअल्सची माहिती)

१. रचना, कार्ये कर्तव्याचा तपशील

विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शिकेतील तत्वानुसार १००% आर्थिक अनुदानासह प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तारसेवा कार्यक्रम ही योजना निरक्षरता निर्मूलनाच्या कार्यासाठी विद्यापीठात १९७९ सालापासून कार्यान्वीत करण्यात आली आहे. सदर योजनेत शासनाच्या धोरणानुसार वारंवार बदल करण्यात आले असून सदर योजनेस खालील प्रमाणे नांवे देण्यात आली.

१. राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम १९७८
   १. भारतसरकारच्या २० कलमी कार्यक्रमन्तर्गत कलम १६(ब) निरक्षरता निर्मूलन
   २. प्रौढ निरंतर शिक्षण आणि विस्तारसेवा
   ३. परिसर विकास कार्यक्रम (एरिया डेव्हलपमेंट अप्रोच)
   ४. संपूर्ण साक्षरता अभियान

उपरोक्त कार्यक्रमानुसार निरक्षरता निर्मूलन निरंतर शिक्षण, लोकसंख्या शिक्षण, विस्तारसेवा आदि कार्यक्रमांची अमलबजावणी केल्यानंतर नवव्या पचवार्षिक योजनेत निरंतर शिक्षणावर भर देण्यात आला.

दहाव्या पंचवार्षिक योजनेतहत विभागाच्या कामाचे स्वरुप बदलल्याने प्रौढ निरंतर शिक्षण आणि विस्तारसेवा केंद्रास विद्यापीठाचे अधिकारमंडळ व शासन मान्यतेने विद्यापीठ संहिता/अधिनियम बदलून शैक्षणिक विभागाचा दर्जा मार्च २००२ पासुन विभागास देण्यात आला. ज्याअर्थी विभागास शैक्षणिकदर्जा प्राप्त झाला त्याअर्थी सदर विभागाचे कामाचे स्वरुप, प्रशासकीय कामा बरोबरच शिकवणे, संशोधन आणि विस्तार कार्याव्दारे समाजाच्या गरजानुरुप अभ्यासक्रम तयार करणे व त्याची अमलबजावणी

करण्याचे कार्य प्रौढ निरंतर शिक्षण आणि विस्तारसेवा विभागाच्यावतीने करण्यात येते. त्याचा तपशिल खालील प्रमाणे

अ) **निरंतर शिक्षण अभ्यासक्रम** : -

समाजातील दूर्बल घटक, सुशिक्षित बेकार, महिला आदिना स्वतःच्या पायावर उभे राहण्याकरिता, आर्थिक क्षमता निर्माण करण्याकरिता विभागाच्या वतीने कमीकालावधीचे स्वंयनिर्वाही अभ्यासक्रम चालविले जातात. त्याचा तपशिल 'प्रपत्र अ' मध्ये देण्यात आला आहे.

ब) **विस्तार कार्य** : -

विद्यापीठाशी संलग्नीत (४०) महाविद्यालयातून विस्तार शिक्षणाचे कार्यक्रम राबविले जातात. सदर कार्यक्रमव्दारे समाजात जाणिव जागृती निर्माण होवून विकासप्रक्रिया (शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक ) गतीमान व्हावी हा उद्येश असतो. जाणिव जागृतीच्या या कार्यक्रमान्तर्गत लोकसंख्या शिक्षण, पर्यावरण, आरोग्य, व्यसनमुक्ती, एड्स निर्मूलन, मुलगा मुलगी समानता, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा, वैज्ञानिक दृष्टीकोन, अंधश्रध्दा निर्मूलन आदि उपक्रम राबविले जातात.

क) **ई-लर्नींग** :-

प्रौढ निरंतर शिक्षण आणि विस्तारसेवा विभागाच्या वतीने ई-लर्नींग सेंटर प्रस्थापित केले आहे. त्याची सुरवात "बेसीक कोर्स इन काम्प्युटर अप्लीकेशन सर्टिफिकेट" कोर्सने केली असून MKCL च्या परवानगीने MS-CIT हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे.

ड) **विद्यार्थी समुपदेशन/व्यवसाय मार्गदर्शन आणि निवड** :-

विद्यार्थी समुपदेशनाकरिता विविध विद्या शाखेच्या विद्यार्थ्यांची नांवनोदंणी, त्या विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्याकरिता तज्ञ साधन व्यक्तिच्या व्दारे मानसशास्त्रीय साधनांचा उपयोग करुन मार्गदर्शन करण्यात येते. तसेच त्यांचे व्यावसायिक कौशल्ये विकसित होण्याकरिता विविध क्षेत्रातील तज्ञांना आमंत्रित करुन व्यवसायमार्गदर्शन केले जाते.

विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व व्यवसाया विषयी मार्गदर्शन केल्यानंतर विविध क्षेत्रातील उद्योगधंद्यातील स्वंयसेवी सं्स्था, कंपन्या, आदिंना विद्यापीठात प्लेसमेंटकरिता

निमंत्रित करुन शिकत असतानाच विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न विभागामार्फत केला जातो.

इ) **दत्तक गांव योजना** :-

विदयापीठा पासून कमी अंतर असणा-या परंतु अविकसित दूर्गम भागात विभागाच्या वतीने गांव विकास प्रकल्प राबविण्यात येतो. या प्रकल्पान्तर्गत गांवविकासाच्या कार्यात संबधित गांव क-यांचे सहकार्य व सहभाग अपेक्षित असते. सदर प्रकल्पासाठी विदयापीठाकडून विभागास रुपये चाळीस हजार (रु. ४०,००० ) आर्थिक अनुदान वर्ष २००८-२००९ करिता देण्यात आले आहे. श्रमदानावर आधारित विकासकामे आणि जाणिव जागत विषयक कार्याक्रम सदर गांवात घेण्यात येतात.

फ) **प्रशिक्षण / उद्‌बोधन/ कार्यशाळा :-**

विस्तार कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याकरिता प्राचार्य, प्राध्यापक, विदयार्थी, समाजिक कार्यकर्ते, स्वंयसेवीसंस्था, जेष्ठ नागरिक, शिक्षकेतर कर्मचारी आदिना त्यांच्या गरनेनुसार प्रशिक्षण, उद्‌बोधन कार्यशाळा आणि सहभाग सभांचे आयोजन करुन सामाजिक बांधीलकीचा भाव जागृत करण्याचे व त्यासंबधी प्रेरणा देण्याचे कार्य विभागाच्यावतीने करण्यात येते.

२- अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्य

महाराष्ट्र विदयापीठ कायदा १९९४ व विदयापीठाने निर्धारित केलेल्या नियमावलीनुसार अधिकारी व कर्मचारी आपले अधिकार व कर्तव्य पालनाचे कार्य करतात.

३- निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व.

विभागाशी संबधीत निर्णय विदयापीठाशी संबधित अधिकार मंडळे, बोर्ड ऑफ अडल्ट एज्युकेशन व विदयापीठ प्रशासनाकडून घेण्यात येतात. विभागाच्या कृती-आराखडयानुसार कार्यक्रमाची अमलबजावणी विभागाचे संचालक आणि इतर अधिकारीवर्ग मार्फत करण्यात येते. सदर अमलबजावणी व्यविस्थीत होण्याकरिता विभागाच्या वतीने कामाची देखरेख, मूल्यमापन व पर्यवेक्षणाची जबाबदारी संचालकासह, सहसंचालक प्रकल्प अधिकारी पार पाडतात. विभागाच्या कार्याविषयीचे उत्तरदायित्व संचालकाकडे असते.